# सं.फौ.खटला क्रमांक ६७५/२०२५ मधील निशाणी ०१ वरील आदेश

फिर्यादीची लेखी फिर्याद तसेच न्यायालयीन अभिलेखावर दाखल करण्यात आलेला धनादेश, सदर धनादेश परत आल्याबाबत बँकेचा रिटर्न मेमो, नोटीसीची स्थळप्रत, आरोपीला पाठविलेली नोटीस, नोटीसीची पोष्टाची पोहच पावती आदी कागदपत्रांच्या प्रतींचे अवलोकन केले.

०२. तसेच फिर्यादीद्वारा शपथपत्राद्वारे दिलेल्या जबाबाचे अवलोकन केले. फिर्यादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. लेखी फिर्याद, न्यायालयीन अभिलेखावर दाखल कागदपत्रे, फिर्यादीने शपथपत्राद्वारे दिलेला जबाब यावरुन फिर्यादीने परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ चे परंतुक/शर्त (अ) ते (क) तसेच कलम १४२ (ब) चे परंतुकाची / शर्तीची पुर्तता केल्याचे दिसून येत आल्याने, सकृत दर्शनी आरोपी विरुध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ अन्वये केलेल्या गुन्हयाच्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी पुरेसे कारण आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे –

## – आ दे श –

आरोपी विरुध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ अन्वये गुन्हा केल्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ अन्वये आदेशीका काढण्यात यावी.

SANTOSH LAXMAN VAIDYA

Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.07.01 17:20:32 +0530

**घोडेगाव**
**दिनांक ०१/०७/२०२६**

(संतोष एल. वैद्य)
**प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, घोडेगाव**
**ता. आंबेगाव जि.पुणे**